राज्यात कायदा सुव्यवस्था हाताबाहेर

विरोधी पक्षांचा सरकारवर आरोप; बीड, परभणी घटनांचा निषेध; चहापानावर बहिष्कार

लोकसत्ता खास प्रतिनिधी

नागपूर : 'ईव्हीएम'च्या बळावर सत्तेत आलेले राज्यातील सरकार दलित आणि शेतकरीविरोधी आहे. परभणी येथे पोलीस बळाचा वापर करून आंदोलकांवर अत्याचार सुरू आहे. एका आंदोलकाचा पोलीस कोठडीत मृत्यू होतो, तर दुसरीकडे बीड जिल्ह्यातील सरपंच संतोष देशमुख यांची दिवसाढवळ्या निर्घृण हत्या केली जाते. त्यामुळे राज्यातील कायदा व सुव्यवस्था हाताबाहेर गेली असून सरकारचे आरोपींना पाठबळ असल्याचा आरोप करत विरोधकांनी सरकारच्या चहापानावर बहिष्कार घातला. विदर्भातील मुख्यमंत्री असतानाही नागपूरमध्ये होणारे हिवाळी अधिवेशन अल्प दिवसाचे असल्याची टीकाही यावेळी करण्यात आली.

हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला रविभवन येथे महाविकास आघाडीच्या संयुक्त बैठकीनंतर आयोजित पत्रकार परिषदेत सरकारवर अनेक आरोप करण्यात आले. यावेळी विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे विधिमंडळ नेते जितेंद्र आव्हाड, आमदार विजय वडेट्टीवार, शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे प्रतोद सुनील प्रभू आदींची उपस्थिती होती. परभणी येथे संविधानाची विटंबना झाल्यावर उमटलेल्या पडसादानंतर झालेल्या 'कॉम्बिंग ऑपरेशन' दरम्यान अटक केलेल्या सोमनाथ सोमवंशी या तरुणाचा कारागृहात मृत्यू झाला. अशा सर्व घटना घडत असताना मुख्यमंत्री मात्र मिरवणुकीत गुंतले आहे, असा टोला अंबादास दानवे यांनी मुख्यमंत्र्यांना लगावला.

सोयाबीन, कापसाला भाव न देणारे हे सरकार आहे. शेतकऱ्यांची दयनीय अवस्था करणारे हे सरकार असल्याची टीकाही दानवे यांनी केली. संख्याबळ कमी असले तरी महाराष्ट्रातील जनतेचे प्रश्न सभागृहात ताकदीने मांडणार असेही दानवे म्हणाले. यावेळी आमदार महेश सावंत, आमदार ज. मो. अभ्यंकर हे उपस्थित होते.

बीडच्या घटनेची सीबीआय चौकशी करा

शहू, फुले, आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्रात संविधानाची विटंबना झाली. बीडमध्ये एका सरपंचाचे अपहरण करून त्याची निर्घृणरित्या हत्या करण्यात आली. बीडमध्ये दोन वर्षात ३२ हत्या झाल्या आहे. आरोपीला राजकीय वरदहस्त आहे. बीडमध्ये जंगलराज सुरू आहे. त्यामुळे बीडच्या घटनेची सीबीआयमार्फत चौकशी करावी. तसेच उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांची चौकशी समिती नेमावी अशी मागणीही विरोधकांनी केली.

मंत्रिमंडळाच्या शपथविधीला निमंत्रण नाही

मुख्यमंत्री पदाच्या शपथविधीला विरोधकांनी बहिष्कार टाकला होता. त्यानंतर रविवारी नागपुरात झालेल्या मंत्रिमंडळाच्या शपथविधी सोहळ्यावे विरोधकांना निमंत्रण दिले नाही, अशी माहिती नाना पटोले यांनी दिली. सरकारने कुणाला मंत्रिपद द्यावे हा त्यांचा परस्पर निर्णय आहे. काँग्रेसचा गटनेता हा १७ तारखेला ठरेल असेही पटोले म्हणाले. विदर्भाचे मुख्यमंत्री झाल्यावर नागपुरात पहिले अधिवेशन असताना, वैदर्भीय जनतेचा अपेक्षाभंग महायुती सरकारने केला आहे. अधिवेशन कालावधी कमी असल्याची टीका विजय वडेट्टीवार यांनी केली.

विरोधी पक्षनेते पदासाठी अर्ज करावा लागत नाही

विरोधी पक्षनेते पदासाठी अर्ज करावा लागत नाही. विधानसभा अध्यक्षांनी असे म्हणणे संसदीय परंपरेला धरून नाही. सर्व विरोधी पक्षांना एकत्रित बोलावून या पदासाठी नाव मागितले जाते. हे नाव निश्चित झाल्यावर त्याची सभागृहात घोषणा होते.

अध्यक्षांनी याबाबत अद्याप कुठलीच पावले उचललेली नाही. यावरून सरकार याबाबत सकारात्मक नाही, अशी टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, राष्ट्रवादीचे जितेंद्र आव्हाड यांनी केली. विरोधी पक्षनेते पदाबाबत आघाडीते कुठलेही मतभेत नाही, असेही पटोले म्हणाले. या मुद्यावर बोलताना आव्हाड म्हणाले, आतापर्यंत विरोधी पक्षनेते पदासाठी कुठलाही अर्ज आल्याचा नमुना अद्येल तर तो आम्हाला द्यावा. त्यानुसार आम्ही पुढची कार्यवाही करू.

मुख्यमंत्र्यांचे उपराजधानीत जल्लोषात स्वागत

लोकसत्ता प्रतिनिधी

नागपूर : नागपूरचे सुपुत्र असलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे रविवारी उपराजधानीत आगमन होताच विमानतळ ते लक्ष्मीभवन चौक या मार्गावरील विविध चौकांत ढोलताशांच्या निनादात व पुष्पवृष्टी करत जल्लोषात स्वागत करण्यात आले. या वेळी 'देवाभाऊ आगे बढो...', 'भारतीय जनता पक्षाचा विजय असो', अशा घोषणांनी विमानतळ परिसर दुमदुमून गेला.

हॉटेल रेडिसनसमोर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी देवेंद्र फडणवीस यांचे स्वागत करत त्यांना शुभेच्छा दिल्या. फडणवीस यांच्या आगमननिमित्त भाजपने त्याच्या स्वागतासाठी शहरात जंगी तयारी केली होती. ठिकठिकाणी मोठे फलक लावण्यात आले होते. राज्याच्या सर्वोच्च पदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर रविवारी दुपारी १२ वाजता त्याचे नागपूर विमानतळावर आगमन झाले. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांचे स्वागत केले. या वेळी विमानतळ परिसरात कार्यकर्त्यांची मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. 'विजेता तू देवाभऊ हूच पुढे चल' हे गाणे त्यांच्या स्वागतानिमित्त वाजवले जात होते.

मंत्रीपदासाठी अडीच-अडीच वर्षांचा फॉर्म्युला

राष्ट्रवादीच्या मेळाव्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांची घोषणा

लोकसत्ता प्रतिनिधी

नागपूर : मंत्रिमंडळात विस्तार होत असताना सर्वांची भावना असते की त्यांना संधी मिळावी. सर्व जण ताकदीचे आणि सक्षम नेते आहेत. मात्र जागा मर्यादित असल्याने एकाच वेळी सर्वांना संधी देणे शक्य नाही. त्यामुळे वंदा सर्वांना संधी देण्यासाठी मंत्रिमंडळात अडीच-अडीच वर्षांचा 'फॉर्म्युला' ठरवला असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नागपूरमध्ये आयोजित राष्ट्रवादीच्या मेळाव्यात केली.

'काही खर्च टाळता येत नाही'

राष्ट्रवादीने महिला व बालविकास विभागाची दिलेली जबाबदारी आदिती तटकरे यांनी नीट प्रकारे सांभाळली आणि लाडकी बहीण योजना यशस्वी केली. लाडकी बहीण योजनेचा डिसेंबर महिन्याचा हप्ता मिळणार आहे. काही खर्च हे आपल्याला करावेच लागतात, ते टाळता येणे शक्य नाही, असे मत अजित पवार यांनी व्यक्त केले. या योजनेमुळेच इतक्या मोठ्या संख्येत आमदार निवडून आणता आले, असेही पवार यांनी सांगितले.

हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रवादी अजित पवार गटातर्फे रविवारी सिव्हिल लाइन्स येथील वसंतराव देशपांडे सभागृहात पक्षाच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या वेळी अजित पवार कार्यकर्त्यांना संबोधित करत होते. मागील तीन वर्षांपासून सर्व जिल्ह्यातील निवडणुका झालेल्या नाहीत. २०२५ मध्येच या निवडणुका व्हायला पाहिजे होत्या. मात्र तीन वर्षे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपासून कार्यकर्ते वंचित राहिले. आता मंत्रिमंडळाचा विस्तार झाल्यानंतर सुनील तटकरे, चंद्रशेखर बावनकुळे आणि एकनाथ शिंदे जो एक प्रतिनिधी देतील, तो सर्व मित्रपक्षाबरोबर चर्चा करेल आणि महामंडळांवर नेमणुका करण्याचा निर्णय तीन महिन्यांत घेतला जाईल. महामंडळाच्या वाटपाबरून पाच वर्षे कार्यकर्त्यांना ताटकळत ठेवणार नाही, असेही अजित पवार म्हणाले. या वेळी राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते प्रफुल पटेल, सुनील तटकरे, दिलीप वळसे पाटील यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

मोदींच्या टीकेनंतरही मंत्रिमंडळात भाजपची घराणेशाही

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

मुंबई : काँग्रेसच्या घराणेशाहीवरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारीच लोकसभेतील उत्तरात हल्ला चढविला होता व राजकारणात नवीन नेतृत्व पुढे आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न होण्यावर भर दिला असला तरी राज्याच्या मंत्रिमंडळ विस्तारात भाजपमध्ये घराणेशाहीची पार्श्वभूमी असलेल्यांना प्रतिनिधीत्व देण्यात आले.

पंकजा मुंडे, नितेश राणे, आकाश फुंडकर, मेघना बोर्डीकर या नवीन मंत्र्यांची पार्श्वभूमी ही घराणेशाहीची आहे. नारायण राणे हे स्वत: खासदार, त्यांची दोन्ही मुले आमदार म्हणून अलीकडेच निवडून आले आहेत. आकाश फुंडकर हे भाजपचे नेते दिवंगत पांडुरंग फुंडकर यांचे पुत्र आहेत. मेघना बोर्डीकर या माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर यांच्या कन्या आहेत. शिवेंद्रराजे भोसले, अतुल सावे, जयकुमार रावल या भाजपच्या मंत्र्यांच्या नातेवाईकांनी मंत्रिपदे वा खासदारकी-आमदारकी भूषविली आहे. राष्ट्रवादीत आदिती तटकरे आणि इंद्रनील नाईक हे दोघेही घराणेशाहीतून पुढे आले आहेत. यापैकी नाईक हे माजी मंत्री मनोहर नाईक यांचे पुत्र आहेत. शिवसेनेत राज्यमंत्री योगेश कदम हे माजी मंत्री रामदास कदम यांचे पुत्र आहेत.

परिशिष्ट-IV-ए - स्थावर मालमत्तांची ई-लिलाव - जाहीर विक्री सूचना

pnb Housing Finance Limited

शाखा कार्यालय : २०९/२०२, दुसरा मजला, मेट्रो ९९ कमर्शियल कॉम्प्लेक्स, कॉलेज रोड, नाशिक-४२२ ००५, महाराष्ट्र.

हाताळणी करायचा तिमिरपट: बुकिंगसाठी www.pnbhousing.com ची भेट द्यावी.

लॉट क्र. / खात्याचे नाव-खात्याचे / इमीच्या विधि वास्तवाचे नाव (रु)	मागणी केलेले खाते व शुल्क (रु)	गहाणवट मालमत्तेचे वर्णन (सी)	राखीव किंमत (आरपी) (रु)	इरादे (आरपीची रक्कम) (१०%) (एम)	बोलीच्या सातपैसाच्या पटीवरची वाढीव (बी)	बोलीदेऊ शकणारे व्यक्ती (एस)	पात्रतेची तारीख व वेळ (आय)	निलंबनाची तारीख व वेळ (ई)	ज्ञात भार/ ज्ञात्यामधील प्रकरणे, जर असल्यास (के)
एकत्रीकृत/एकत्रीकृत/०१९१/१९८५९८ मकरंद जगन्नाथ कुलकर्णी / हिरालाल जगन्नाथ कुलकर्णी शाळा, नाशिक	रु. १९४९६०९९/- रु.९,७६,६०९ रोजीपासून	फ्लॅट क्र. १०५, दुसरा मजला, प्लॉट नं. ३०८, सर्वे नं. ६७/८-५३/२-५६-५८, संकेत अपार्टमेंट, आरुणा गावित आरोहिराजा नगर, सिडको उपनगर, अशोक स्तंभाजवळ, सातपूर रोड, पांडवनगरी शिवार, नाशिक-४२२००५, महाराष्ट्र, (५६८ चौरस फुटाचे)	रु. १९४९६०९९/-	रु. ९८०००/-	रु. ९८०००/-	०४.१२.२०२४ (१२.३०.२०२४ रोजी संध्या. ५.०० पर्यंत)	०६.१२.२०२४ (१२.३०.२०२४ रोजी संध्या. ५.०० पर्यंत)	जरी नाहीत

"महाराष्ट्रीय अस्तुरा आणि/किंवा फ्रेमवरील तिमिरपट लागू, अन्य-वापरलेले ६८५ ६.३८ ग्राम पुरीत्र्य व्यवहार, आहुतीपत्र खाने, किंमान, आकार हुकार एकत्रित. " "सीएमएस इंडियाने कायमचा विश्लेषकांचा पर्यवेक्षण अधिकाऱ्यांना आवश्यक प्रमाण व माहितीदुराव्या व्यवहार क्र. 'क्रमांक जे काही घडून काने आहे ते वगळता वा नष्ट केलेल्या व्यवहार/ मुदतीत परावर्त केले कोणताही भार नाही. याव्यतिरिक्त, सदर भार वास्तवी खरीदीदार/ बोलीदाताला, व्यवस्था/ तिऱ्यावरील, सौशावकाय आहेत/ पक्षात करावयाचा आहेत. भावी खरीदार/ बोलीदाताने विनिमे करण्यात यत्न करो, स्वतंत्र सल्लागारांकडून तपासणी करून विषयाचा घ्यावा.

(१) अ.लॉट तपशीलात, तसे जोडा स्थावर मालमत्ता/ मुदतीत भारत विक्री करण, हस्तांतरण करणे आणि विक्री व्यवहार करावा याबाबत 'परिशिष्ट-IV/परिशिष्ट-IV-ए' मध्ये प्रकाशित केलेल्या अटी व शर्तींचा संदर्भ घेतला जावा.

(२) चल मालमत्ता/ जंगमेतर आणि स्थावर मालमत्ता व्यवहार व्यवहार क्र. 'क्रमांक जे काही घडून काने आहे ते, या जाहिरातीत, त्यामध्ये नमूद केलेल्या मालमत्तेचे वर्णन, मालमत्ता, मोठे हुकार, जंगमेतर/ जंगमेतर/ व्यवहार व्यवहार क्र. 'क्रमांक जे काही घडून काने आहे' यांच्या अधीन विक्रीस/ लीज करण्यास ठेवण्यात आले आहेत. बोलीदाता/ लीज धारकाच्या/ या विक्रीच्या/ लीज करारामुळे या मालमत्तेवर कोणतेही भार/ दायित्व/ बोजे असल्यास ते स्वतःच्या खर्चाने काढून टाकणे आवश्यक आहे.

(३) कृपया नोंद घ्यावी की, तिमिरपट हस्तांतर (एमएसटी) रु.२,०००/- (रुपये दोन हजार फक्त) एवढ्या किंमतीच्या स्वतंत्र धनादेशाद्वारे स्वीकारले जाईल. ज्या बोलीदाते/ बोलीदात्याने बोली लावली आहे, त्यांनी तिमिरपट हस्तांतर (एमएसटी) रु.२,०००/- (रुपये दोन हजार फक्त) एवढ्या मूल्याचा धनादेश सोबत आणावा.